# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक** : **प्रश्नोत्तरे.**

**दोन** : **कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

| | | |
|---|---|---|
| **सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री** | : | विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन** : **स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**चार** : **लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री. भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, हसन मुश्रीफ, राणाजगजीतसिंह पाटील, नरहरी झिरवाळ, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, किसन कथोरे, सुरेश लाड, दिपक चव्हाण, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. राजेश टोपे, जयदत्त क्षीरसागर, राहुल जगताप, दत्तात्रय भरणे, प्रदीप जाधव-नाईक, हनुमंत डोळस, विजय भांबळे, मकरंद जाधव-पाटील, श्रीमती दिपिका चव्हाण, डॉ. सतीश पाटील, श्री. पंकज भुजबळ, श्रीमती ज्योती कलानी, सर्वश्री. राहुल मोटे, बाळासाहेब पाटील, संजय कदम, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"लोटे-परशुराम (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औदयोगिक वसाहतीतील रासायनिक कारखान्यांचे सांडपाणी सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया (सी.ई.टी.पी.) प्रकल्पालगत असलेल्या चेंबरमधून ओव्हरफ्लो होवून उघडयावर वाहून जाण्याचा प्रकार माहे जानेवारी,

२०१८ मध्ये निदर्शनास येणे, रासायनिक सांडपाणी सोडण्यात येणारे सर्व व्हॉल्व्ह बंद असतानाही चेंबर भरून वाहत असल्याने लगतच्या गावांतील नागरिकांच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, त्याचबरोबर दुषित रासायनिक सांडपाणी थेट दाभोळ व जगबुडी तसेच वाशिष्ठी खाडीपात्रात सोडण्यात येत असल्यामुळे आंजणीजवळील कालचाडू, खवल, मांगण, अनु, जिताडा, कोमटा, शिंगटी आदी प्रकारची मासळी मोठया प्रमाणात मृत पावल्यामुळे मच्छिमारांच्या उदरनिर्वाहाचा निर्माण झालेला प्रश्न, सी.ई.टी.पी., एमआयडीसी तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार तक्रारी करुनही संबंधितांनी त्याकडे जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, त्याचबरोबर सी.ई.टी.पी. च्या विस्तारीकरणाच्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असणे, उक्त प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधी व नागरिकांनी वारंवार मागणी करुनही कोणतीच कारवाई करण्यात न आल्याने त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **ॲड. पराग अळवणी, श्री. नरेंद्र पवार, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, सर्वश्री. नरेंद्र मेहता, अतुल भातखळकर, विलासराव जगताप, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. संजय केळकर, प्रशांत ठाकूर, किसन कथोरे, योगेश सागर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईसह राज्यात गत वर्षी दोन लाख नव्या क्षयरोग रुग्णांची नोंद होऊन त्यापैकी १ हजार रुग्णांचा पुरेसा उपचाराअभावी झालेला मृत्यु, राज्यात आढळून आलेल्या क्षयरोगाच्या रुग्णांपैकी ६६ टक्के हे मुंबई शहरातील असणे, मुंबईत गर्दीने भरलेल्या लोकलमधून प्रवास करणे, दाट लोकवस्ती, कोंदट घरे, प्रदूषण, कुपोषण, अपुरे उपचार यांसह विविध कारणांमुळे क्षयरोग मोठ्या प्रमाणावर पसरणे, राज्यामध्ये क्षयरोग मुळापासून नष्ट करण्यासाठी जनजागृती अभियान राबविण्याची गरज, सन २०२५ पर्यंत देशातून क्षयरोग हद्दपार करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असून, क्षयरोग निर्मूलनासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, मो. आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमिन पटेल, त्र्यंबक भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. संग्राम थोपटे, राहुल बोंद्रे, भारत भालके, जितेंद्र आव्हाड, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, राणाजगजीतसिंह पाटील, नरहरी झिरवाळ, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, किसन कथोरे, सुरेश लाड, दिपक चव्हाण, श्रीमती सुमन पाटील, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री. योगेश सागर, प्रकाश फातर्पेकर, राजेश टोपे, जयदत्त क्षीरसागर, राहुल**

**जगताप, दत्तात्रय भरणे, प्रदीप जाधव-नाईक, हनुमंत डोळस, विजय भांबळे, मकरंद जाधव-पाटील, श्रीमती दिपिका चव्हाण, डॉ. सतीश पाटील, श्री. पंकज भुजबळ, श्रीमती ज्योती कलानी, सर्वश्री. राहुल मोटे, बाळासाहेब पाटील, संजय कदम, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, ॲड. यशोमती ठाकूर, श्री. डी.पी. सावंत, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री. अबु आजमी, संग्राम जगताप, शांताराम मोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पशुसंवर्धन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात असलेली सुमारे दोन कोटी १० लाख जनावरांना लाळ-खुरकूत रोगाची लागण होऊ नये यासाठी राबविण्यात येणारी लसीकरण मोहिम गत वर्षभरामध्ये राबविण्यात आली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये निदर्शनास येणे, या रोगासाठी देण्यात येणाऱ्या लस पुरवठादार कंपनीने निविदेतील अटी व शर्तीचा भंग करुन शासनाची केलेली फसवणूक, लसीकरण न झालेल्या प्रादुर्भावग्रस्त भागात निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, औषधांचा सुरु असलेला काळाबाजार, उपचारासाठी प्रति जनावर दीड ते दोन हजार रुपये खर्च येत असल्यामुळे त्रस्त झालेले पशुपालक शेतकरी, आतापर्यंत सहा वेळा लशीच्या खरेदीसाठी निविदा काढूनही निविदा अंतिम करण्यात अपयश आल्यामुळे आता सातव्यांदा निविदा काढण्याची आलेली वेळ, परिणामी एफएमडी (फूट अँड माऊथ डिसीझ) लस देण्यास लावलेली दिरंगाई, लाळ-खुरकूत रोगावर लस दिली नाही तर २० लिटर दूध देणारी गाय अथवा म्हैस दोन लिटरवर येणे, दुग्धजन्य पदार्थ व कृषी उत्पादनांच्या निर्यातीमध्ये देशाचे २० हजार कोटीचे नुकसान होत असल्याचे केंद्र शासनाने राज्य शासनास कळविलेले असणे, सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्याची लोकप्रतिनिधी व शेतकरी संघटनांनी शासनाकडे दिनांक ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी केलेली मागणी, त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात न आल्याने पशुपालक शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस).**

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८.

**(२)** सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०१८.

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री.हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, अजित पवार, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, संदिप नाईक, अबु आझमी, दिलीप वळसे-पाटील, भारत भालके, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री. संजय कदम, हसन मुश्रीफ, राहुल जगताप, संग्राम जगताप, सुरेश लाड, दिलीप सोपल, वैभव पिचड, आसिफ शेख, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, बाळासाहेब पाटील, श्रीमती सुमनताई पाटील, श्री.पंकज भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनील केदार, अमर काळे, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अमित झनक, भारत भालके, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ — पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री.हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख,अजित पवार, जितेंद्र आव्हाड,शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, संदीप नाईक, अबु आझमी, दिलीप वळसे-पाटील, भारत भालके, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री. संजय कदम, हसन मुश्रीफ, राहुल जगताप, संग्राम जगताप, सुरेश लाड, दिलीप सोपल, वैभव पिचड, आसिफ शेख, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, बाळासाहेब पाटील, श्रीमती सुमनताई पाटील, श्री.पंकज भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ — महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमर काळे, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला**

**गावीत, श्री.कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अमित झनक, भारत भालके, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री सुनिल प्रभु, राजेंद्र पाटणी, सुरेश धानोरकर, संजय सावकारे, डॉ. संजय रायमुलकर, श्री संतोष दानवे, डॉ.शशिकांत खेडेकर, सर्वश्री सुधीर पारवे, सुभाष साबणे, विकास कुंभारे, डॉ. जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री सुधाकर कोहळे, संदीपान भुमरे, कृष्णा गजबे, राजाभाऊ वाजे, विजय रहांगडाले, अनिल कदम, चरण वाघमारे, योगेश घोलप, उन्मेश पाटील, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. आर.टी.देशमुख, सुरेश गोरे, ॲड गौतम चाबुकस्वार, प्रा. संगिता ठोंबरे, सर्वश्री नारायण पाटील, सुधाकर भालेराव, प्रकाश आबिटकर, किर्तीकुमार भांगडिया, अनिल बाबर, रणधीर सावरकर, राजेश क्षीरसागर, गोवर्धन शर्मा, डॉ.मिलिंद माने, सर्वश्री मंगेश कुडाळकर, भिमराव धोंडे, समीर कुणावार, शिवाजीराव कर्डिले, बाळासाहेब मुरकुटे, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री बाळासाहेब सानप, संजय केळकर, डॉ. राहुल आहेर, वि.स.स यांचा म.वि.स. नियम** २९३ **अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात जालना, परभणी, बुलढाणा, बीडसह मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व विदर्भातील अनेक तालुक्यांमध्ये दिनांक ११ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास गारपीटीचा प्रचंड तडाखा बसणे तसेच विदर्भातील काही भागात वीज कोसळून ७ जणांचा बळी गेल्याचे व १६ जण जखमी झाल्याचे निदर्शनास येणे, तूर, हरभरा, गहू, ज्वारी ही काढणीला आलेली पिके आकस्मिकरित्या गारांच्या तडाख्यात सापडल्याने भुईसपाट होणे, संत्रा आणि द्राक्ष बागांचे

प्रचंड नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, या भागातील शेतकऱ्यांनी मेहनत करून उभी केलेली पिके मातीमोल होणे, विशेषत: विदर्भातील बोंडअळीमुळे कापूस पिक गमावलेल्या शेतकऱ्यांचा गारपीटीमुळे हातातोंडाशी आलेला पिकांचा घास गेला असल्याचे व शेतकऱ्यांची लाखो रुपयांची पीकहानी झाली असल्याचे आढळून येणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या हानी झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याचे आणि विमा कंपन्यांना आकडेवारी सादर करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले असणे, याबाबत शासनाने कार्यवाही करून गारपीटग्रस्तांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१८

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.